# शासकीय तंत्रनिकेतन,तूळजापूर रोड, उस्मानाबाद

**Government Polytechnic, Osmanabad**

**Tuljapur Road Osmanabad – 413 501. (Maharashtra)**

Phone: 91-2472-251745, Fax: 91-2472-251745

E-mail - office.gposmanabad@dtemaharashtra.gov.in 0118office@msbte.com


## शिष्यवृत्ती सूचना

जा.क्र.शातंउ/विवि/२०२१/ 92

दिनांक-

स्कॉलरशिप/फ्रिशीप/राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शिष्यवृत्ती (ईबीसी) /डॉ.पंजाबराव देशमुख हॉस्टेल मेंटेनन्स/अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती / अपंग शिष्यवृत्ती २०२०-२१ करिता महाडिबीटी पोर्टलवरुन अर्ज भरण्याची प्रक्रिया पुर्ण करणेबाबत.

या संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यांत येते की, २०२०-२१ करिता **https://mahadbtmahait.gov.in** करिता ही शासनाची वेबसाईट ऑनलाईन अर्ज भरण्याच्या प्रक्रिया चालू करण्यांत आली आहे. त्या अनुषंगाने स्कॉलरशिप/फ्रिशीप/ईबीसी २०२०-२१ च्या सवलतीसाठी पात्र असणा-या सर्व प्रवर्गातील (SC/ST/SBC/OBC/VJ/DT/NT/SEBC/OPEN(EBC)(EWS) MINORITY SCHOLARSHIP ETC.) विद्यार्थ्यांना Original कागदपत्रे अपलोड करुन आपल्या महाडिबीटीच्या लॉगीनद्वारा अर्ज भरण्याची प्रक्रिया खालील सुचना काटेकोर लक्षात घेऊन दिलेल्या मुदतीत पुर्ण करावी.

-: विद्यार्थ्यासाठी महत्वाच्या सुचना :-

०१.सर्व विद्यार्थ्यांना शासनाच्या पोर्टलवरील **https://mahadbtmahait.gov.in** या वेबसाईटवरुन ऑनलाईन अर्ज भरणे अनिवार्य आहे. आपण ऑनलाईन अर्ज भराल या तत्त्वावर आपणास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये फी मध्ये प्रवर्गनिहाय सवलत लागु करुन प्रवेश देण्यांत आलेला आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज हा अचुक भरणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांनी कोणत्याही परिस्थितीत अर्ज भरण्यास दिरंगाई केल्यास सवलतीचा लाभ रदद केला जाऊ शकतो याची नोंद घ्यावी.

०२. अर्ज भरतांना फी भरण्याच्या माहितीमध्ये फी भरली आहे का असे विचारले आहे तेथे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ प्रथम व थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी यांना रु १७५०/-ऐवजी १५५०/-, ४७५०/- ऐवजी ४५५०/-, किंवा ७७५०/- ऐवजी ७५५०/- ऑनलाईन असे नमुद करावे. (कारण फिस मध्ये आकारण्यांत आलेल्या शुक्लामध्ये रु २००/-ही अनामत रक्कम असुन सदर रक्कम Refundable आहे. )

०३. अर्ज भरताना,प्रथम प्रवेश घेतलेले वर्ष, सध्याचे चालु असलेले शैक्षणिक वर्ष व शाखा, महाविद्यालयाचे नाव इत्यादी माहिती कोणत्याही परिस्थितीत चुकता कामा नये.

०४. या वर्षीची म्हणजे सन २०२०-२१ ची फी पावती ओरिजनल असली पाहीजे , उत्पन्न दाखला हा ओरिजनल अपलोड केलेला असला पाहीजे , त्याशिवाय आपला अर्ज संकेतस्थावरुन मंजुर केला जाणार नाही.

०५. विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्जासोबत खालील योग्य ती कागदपत्रे अपलोड न केल्याने शासन /महाविद्यालयाकडुन विद्यार्थ्यांना अर्ज त्यांचे लॉगीनवर पुन्हा कागदपत्रं/कागदपत्रे अपलोड करणेकरिता Sent Back to applicant असा शेरा मारुन अर्ज Revert केला जाऊ शकतो अथवा इतर काही दुरुस्तीकरिता पाठविले जाऊ शकतो, अश्या वेळेस विद्यार्थ्यास महाविद्यालयाने/शासनाने सांगितलेली दुरुस्ती करुन ऑनलाईन अर्ज पुन्हा महाविद्यालयाच्या अॅप्रुव्हल प्रक्रियेसाठी सादर करणे आवश्यक

आहे. अन्यथा सवलत रदद होऊ शकते व त्याकामी विद्यार्थी लाभापासुन वंचित राहु शकल्यास महाविद्यालय जबाबदार राहणर नाही.

०६. विद्यार्थ्यांचा अर्ज शासनाचे समाज कल्याण विभाग, तंत्रशिक्षण संचालनालय इ. विभागाने मान्य (Approved) केला गेला आहे. किंवा नाही याची दक्षता विद्यार्थ्यांनी घ्यावी. जोपर्यंत अर्ज शासनाकडुन मंजुर होत नाही तोपर्यंत विद्यार्थ्यांनी लॉगीन तपासणे अनिवार्य आहे.

०७.विद्यार्थ्यांना शासनाकडुन सवलत दिली गेलेली असल्यामुळे शासनाने दिलेल्या मुदतीतच ऑनलाईन अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांने कोणत्याही परिस्थितीत अर्ज भरण्यास विलंब करु नये.

०८.विद्यार्थ्यांचे बँकेशी आधार कार्ड लिंक असणे अतिशय आवश्यक आहे. जर आधार कार्ड लिंक नसेल तर अशा विद्यार्थ्यांचा अर्ज जरी शासनाने मंजुर केला असला तरी फी प्रतिपुर्ती केली जात नाही.याची नोंद घ्यावी.

०९.विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज न भरलयाने किंवा नामंजुर झाल्यास किंवा अज Student Login मध्ये Pending राहिल्यास विद्यार्थ्यांस दिली गेलेली सवलत रदद होते व त्यास त्या वर्षाचे संपुर्ण शुल्क भरणे बंधनकारक राहील

१०.खालील कागदपत्रे ऑनलाईन अर्जासोबत या संस्थेच्या विद्यार्थी विभागात सादर करणे बाबतचे वेळापत्रक/ सुचनानंतर देण्यात यावे.

| Sr No | Name of the Documents | Scholarship | Freeship | EBC/SEBC |
|---|---|---|---|---|
| 01 | Print out of online filed application(Scholarship/freeship/EBC)2020-21 | √ | √ | √ |
| 02 | Recipt cum acknowledgement of confirmation of Admission Letter /CAP letter, issued by college authority at First time admission process | √ | √ | √ |
| 03 | Parent's Annual Income Certificate issued by Tehsildar | √ | √ | √ |
| 05 | Family Declaration in Govt. Format(available on student login) | √ | √ | √ |
| 06 | Caste Certificate (SC/ST/SBC/OBC/VJ/DT/NT/SEBC) | √ | √ | NA |
| 08 | Non Creamy Layer Certificate (except SC/ST) | √ | √ | NA |
| 09 | Marksheet of 10th, 12, ITI,etc. | √ | √ | √ |
| 10 | Leaving/Transfer Certificate (10 &12 th ) | √ | √ | √ |
| 11 | Nationality & Domicile certificate | √ | √ | √ |
| 12 | Student's Bank Passbook/Cheque with IFSC & MICR code number | √ | √ | √ |
| 13 | Student's Aadhar (UID)card | √ | √ | √ |
| 14 | Student's Aadhar card Linked Proof of the bank | √ | √ | √ |
| 15 | Hostel Certificate & fee paid recipt (if applicable) | √ | NA | √ |
| 16 | Registered Rent Agreement copy (if applicable) | √ | NA | √ |
| 17 | Attested copy of Parent's rationing card included student's name | √ | √ | √ |
| 18 | अल्प भुधारक प्रमाणपत्र (पंजाबराव देशमुख हॉस्टेल मेंटेनन्स क्लेमकरिता) | √ | √ | √ |
| 19 | Student's Attendance Certificae 2020-21 | √ | √ | √ |
| 20 | Student's Father Death Certificate/Divorce order of parent's (if applicable) | √ | √ | √ |
| 21 | Gap certificate on Rs 100/- stamp paper(if applicable) | √ | √ | √ |
| 22 | Self Attestion Form signed by student | √ | √ | √ |
| 23 | Receipt of college fees paid 2020-21 | √ | √ | √ |

११. विद्यार्थ्यांने अर्ज केला नाही किंवा अर्ज नामंजुर झाल्यास किंवा अर्ज Student Login मध्ये Pending राहिल्यास त्यास यावर्षाचे संपुर्ण शुल्क विना तक्रार भरावे लागेल याची संबंधित सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत कोणतीही दिरंगाई होता कामा नये अशा सक्त सुचना विद्यार्थ्यांना देण्यांत येत आहे.

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद.

प्रत :- १) संस्थेच्या मुख्य सुचना फलकावर विद्यार्थ्यांना माहितीस्तव.
२) विभागप्रमुख स्थापत्य/ यंत्र/संगणक / डीडीजीएम/अणुविदयुत/ स्वयंचल/विज्ञान यांना प्रत देउन कळविण्यांत येते की, सदर सुचना आपल्या स्तरावरुन विदयार्थ्यांच्या निदर्शनास आणुन दयावी.
३) कुलमंत्री मुलांचे / मुलींचे वसतीगृह यांना प्रत देउन कळविण्यांत येते की, वसतीगृहात राहणा-या सर्व विदयार्थ्यांना सदरील सुचना आपल्या स्तरावरुन विदयार्थ्यांच्या निदर्शनास आणुन दयावी.